सं. फौ. ख. क्र.३०/२०१५ निशाणी ९८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ९ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव — गणेश नामदेव गावडे

वय — ४० वर्षे, व्यवसाय – पोलीस उपायुक्त, संरक्षण, मुंबई

पत्ता — वरळी सी. फेस, वरळी, मुंबई

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २४.११.२०१४ रोजी मी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन बाळापुर येथे कार्यरत होतो. त्या दिवशी सहा.पो.नि. श्री. काटकर यांनी कवठा बॅरेज येथे काही इसम अर्धवट गाडलेल्या लोखंडी टाकीत डिझेल उतरवित असल्याची माहिती दिली. सदर माहिती मिळाल्यानंतर आम्ही तहसिलदार श्री. सोळंके आणि जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.टाकसाळे यांना त्यांचे विभागातील कर्मचारी यांना बातमीच्या ठिकाणी हजर राहणेबाबत कळविले. आम्ही कवठा बॅरेज येथे बातमीच्या ठिकाणी गेलो असता आम्हाला आय.ओ.सी.एल. कंपनीचा एक टँकर उभा दिसला. त्याठिकाणी टँकर चालक जयवंत माने यांना विचारणा केली असता त्यांनी गायगाव येथील ऑईल डेपोमधुन ६००० लिटर डिझेल आणि ६००० लिटर पेट्रोल असे निंबा फाटा येथे पेट्रोलपंपवर उतरवण्यासाठी आणले असुन त्यापैकी ६००० लिटर पट्रोल आणि ३००० लिटर डिझेल असे निंबा फाटयावरील पट्रोलपंपवर उतरवुन उर्वरित ३००० लिटर डिझेल पेट्रोलपंपचे मॅनेजर कैलास खट्टी यांनी कवठा बॅरेज येथे उतरविण्यास सांगितल्याचे सांगितले. सदर डिझेल कवठा बॅरेज येथे उतरवित असतांना पोलीस आल्यामुळे त्यांनी डिझेल उतरविण्याचे काम थांबविले. त्या ठिकाणी हजर असलेला क्लिनर राज मोहम्मद शेख यास विचारणा केली असता त्याने देखील चालकाने दिलेल्या माहितीप्रमाणे माहिती दिली. त्या ठिकाणी श्री. साबळे आणि पुरवठा निरिक्षक श्री. देशमुख यांचे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर पंचनामा नि.क्र. ३९ वर आहे. तो तोच आहे. त्यावर माझ्या, पंचांच्या आणि आरोपी जयवंत माने यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर टँकरमधील आणि लोखंडी टाकीमधील डिझेल जप्त करुन टँकर आणि लोखंडी टाकीमधील डिझेलचे प्रत्येकी ७५० मिलीचे ३ नमुने असे एकुण ६ नमुने सि.ए.करीता काढुन त्यांना पंचांसमक्ष सिल केले. जमीनीत अर्धवट गाडलेल्या टाकीला कुलुप लावले.

टँकर, त्या मधील डिझेल, डिझेल उतरविण्यासाठीचा एक मोटर पंप, लोखंडी टाकीमधील डिझेल, त्याचे नमुने इत्यादी जप्त करुन त्यांचा जप्ती पंचनामा केला. सदर जप्ती पंचनामा नि.क्र. ४० वर आहे. तो तोच आहे. त्यावर माझी, आरोपी जयवंत माने आणि पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. कारवाई दरम्यान बाळापुरचे नायब तहसिलदार श्री. किर्तक हजर होते. कारवाई झाल्यानंतर मी चालक, क्लिनर, पेट्रोलपंपचे मॅनेजेर, आणि प्रोजेक्टर इंजिनिअर यांचे विरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्याद नि.क्र. ८५ वर आहे. सदर फिर्याद तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावरुन प्रथम खबरी अहवाल नि.क्र. ८६ नोंदविला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी जप्त केलेला मोटर पंप दाखविल्यास मी ओळखु शकेल. मला सदरचा मोटर पंप दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यास वस्तु नि. अ देण्यात आलेली आहे. मी आरोपींना ओळखतो. आजरोजी ४ आरोपींपैकी ३ आरोपी न्यायालयात हजर आहे. (आरोपी क्र. ४ चा गैरहजेरीचा अर्ज मंजुर करण्यात आला.)

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.अग्रवाल यांचे मार्फत</u>**

२. मला पुरावा देण्यासाठी या प्रकरणातील सर्व कागदपत्रे मिळाली. दि.२४.११.२०१४ रोजी मी राज्य शासनाचा कर्मचारी होतो. मला बाळापुर पोलीस स्टेशनचे ए.पी.आय.श्री.काटकर यांनी साधारण दुपारी ०२.००–०३.०० चे दरम्यान सदर घटनेची माहिती दिली. श्री. काटकर यांना घटनेची माहिती कुठुन मिळाली मला माहित नाही. मी सरळ घटनास्थळावर गेलो. मी श्री. काटकर यांच्याकडे काय बातमी मिळाली याची शहानिशा केली नाही. सदर बातमीची नोंद स्टेशन डायरीत घेतली किंवा नाही याबद्दल मी श्री. काटकार यांना विचारले नाही. पोलीस स्टेशनला जावुन सदर घटनेची बातमी कोणी दिली व काय बातमी दिली त्याबद्दल स्टेशन डायरीच्या नोंदी पाहिल्या नाहीत. श्री.काटकर यांना बातमी कोणी दिली व काय दिली त्याची नोंद घेवुन ती पाकीटात ठेवल्याबद्दल मी त्यांना विचारणा केली नाही. मी घटनास्थळावर साधारण ०४.३०–०५.०० वाजताच्या दरम्यान पोहोचलो. श्री. काटकर यांनी बातमीच्या रिपोर्टची नोंद केली किंवा कसे मला निश्चित सांगता येणार नाही. श्री. काटकर यांनी मला

कोणता गुन्हा घडल्याची माहिती दिली नाही. घटनास्थळावर जावुन मी कोणता गुन्हा घडला याची चौकशी केली. श्री. काटकर यांनी भा.दं.वि. कलम २८५ आणि ई.सी. ॲक्टच्या संदर्भात गुन्हा घडल्याचे सांगितले.

३. टॅंकर निश्चित १२००० लिटरचा येतो किंवा कसे त्याबद्दल मला निश्चित माहिती नाही. १२००० लिटरचा टॅंकर पेट्रोलपंपवर ३०–४५ मिनिटात खाली होतो किंवा कसे त्याबद्दल मला माहिती नाही. मी सर्व कारवाई केली त्या पुर्वी घटनेचा प्रथम खबरी अहवाल दाखल नव्हता.

प्रश्न – श्री. काटकर सदर घटनेचा प्रथम खबरी अहवाल देवु शकले असते ?

उत्तर – साधारणतः अशा गुन्हयामध्ये पंचनामा झाल्यानंतर प्रथम खबरी अहवालाची नोंद केली जाते.

हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेत पेट्रोलियम ॲक्टचा गुन्हा नोंदविलेला आहे. काय गुन्हा घडला आहे हे घटनास्थळावर जाई पर्यंत मला माहित नव्हते. घटनास्थळावर जावुन पाहिल्यानंतर मला काय गुन्हा घडला त्याची माहिती मिळाली. माहिती मिळाल्यानंतर मी पेट्रोलियम ॲक्ट अनुसार गुन्हया संबंधी चौकशी करण्याकरीता वरिष्ठांकडुन मार्गदर्शन घेतले नाही. केंद्र सरकारने घटना घडली त्यापुर्वी पेट्रोलियम ॲक्ट अंतर्गत पेट्रोलियम पदार्थाची आयात, साठवणुक आणि रिसेप्टॅकल आणि साठवणुकीचे साधने इत्यादीचे निरिक्षण करणेबाबत अधिकार प्रदान केले किंवा कसे मला माहिती नाही. कोणतीही चौकशी करण्यापुर्वी त्या चौकशीचे अधिकार आहे किंवा नाही त्याबद्दल मी शहानिशा करतो.

प्रश्न – केंद्र सरकारने माझी नियुक्ती झाली तेव्हापासुन ते आजपर्यंत पेट्रोलियम ॲक्टच्या कलम १४ नुसार माझ्या नावाने किंवा माझ्या कार्यालयाच्या नावाने नोटीफिकेशन दिले आहे का ?

उत्तर – मला त्याबद्दल काही माहित नाही.

पेट्रोलियम प्रोडक्टचा फ्लश पॉईन्ट आणि त्याचे क्लास बद्दल माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही पेट्रोल पुरवठा कंपनीला परवाना असल्यावरच ते संबंधीत टॅंकर मार्फत पेट्रोलियम पदार्थाची वाहतुक करणे शक्य होते. टॅंकर मालकाला पत्र देवुन पेट्रोल पुरवठा करण्याचा परवाना आहे किंवा नाही त्याबद्दल माहिती घेतली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, वेळ कमी असल्यामुळे परवान्याबद्दलची माहिती

घेतली नाही. ज्या कंपनीकडुन पेट्रोल आणले गेले त्या कंपनीकडे मी टँकरचा परवाना आहे किंवा नाही त्याबद्दल चौकशी केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, तपासाचा भाग असल्याने चौकशी केली नाही. सदर गुन्हयाचा तपास सहा पो. नि. श्री.काटकर यांच्याकडे होता. मी सदर घटनेचा रिपोर्ट साधारण ०८.०० वाजताच्या दरम्यान दिला.

प्रश्न – दुपारी ०२.०० पासुन ते रात्री ०८.०० वाजता गुन्हा दाखल करण्यापुर्वी टँकर मालक किंवा आय.ओ.सी.एल. कंपनीकडे मोबाईल परवान्याविषयी विचारणा करु शकले असते ?

उत्तर – घटनेची कारवाई करुन घटने संदर्भात गुन्हा दाखल करणेवर आमचे लक्ष होते. त्यानंतर तपासा दरम्यान परवान्या विषयी चौकशी केली असती.

५. अर्धवट गाडलेल्या लोखंडी टाकीसह पेट्रोलियम प्रोडक्ट साठविण्याचा आणि एक्प्लोजिव्ह विभागाकडुन परवाना मिळाल्याची विषयी मी चौकशी केली नाही. पेट्रोलियम पदार्थाची चाचणी पेट्रोलियम ॲक्ट मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे केलेली असते किंवा कसे त्याबद्दल मला माहिती नाही. पेट्रोलियम ॲक्ट खाली नमुना घेण्याचे अधिकार मला केंद्र सरकारकडुन देण्यात आले होते किंवा नाही त्याबद्दल मला माहिती नाही. मी केलेल्या कारवाई संबंधी माझ्याकडे कोणतीही तक्रार आली नाही. रिपोर्ट देण्यापुर्वी मी श्री. काटकर यांच्याकडे बातमी मिळाल्याबद्दलची शहानिशा केली किंवा कसे मला आठवत नाही. मी प्रथम खबरी अहवालात मोटर पंपचा उल्लेख केला किंवा नाही मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, पंचनाम्यामध्ये मोटर पंपचा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि श्री. काटकर यांनी संपुर्ण खोटी कारवाई कागदावर दाखवुन केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेचा रिपोर्ट दिला त्यानंतर मला घटनेबद्दल काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी श्री. काटकर यांच्या सांगण्यावरुन आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिलेला आहे.

<u>उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांचे मार्फत</u>

६. आरोपी क्र. १ ते ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधिज्ञ यांनी मान्य करुन तोच त्यांचा उलटतपास आहे असे समजण्या यावा असे सांगितले.

७. हे म्हणणे खरे आहे की, चालक श्री. जयवंत माने यांनी डिझेल आणि पेट्रोल संबंधी दिलेल्या माहितीवर मी गायगांव येथील ऑईल डेपोवर स्वतः चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २४.११.२०१४ रोजी मी ६००० लिटर पेट्रोल आणि ६००० लिटर डिझेल गायगांव येथील ऑईल डेपोमधुन गेल्याबाबत कोणतीही चौकशी केली नाही. ऑईल डेपोमधुन डिझेल गेल्याच्या माहितीबाबत चौकशी केली असती तर त्याची माहिती मला निश्चितच मिळाली असती की, त्या दिवशी गायगांव येथील ऑईल डेपोमधुन ६००० लिटर पेट्रोल आणि ६००० लिटर डिझेल गेलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट देण्यापुर्वी मी निंबा फाटा येथील पेट्रोलपंप मालकाकडे ६००० लिटर पेट्रोल उतरविण्याविषयी चौकशी केली नाही. तपासादरम्यान माझे स्वतंत्र बयान घेतले किंवा नाही मला आठवत नाही. असे झाले नाही की, घटना झाल्यानंतर एक दिड महिन्यातच माझी बदली झाली. मी श्री. काटकर यांच्याकडे दिलेल्या रिपोर्टच्या तपासाबद्दल चौकशी केली होती. पुरावा देण्यापुर्वी मी दोषारोपपत्रासोबत असलेले सर्व दस्तावेज वाचलेत. दोषारोपपत्रामध्ये मला माझे बयान नोंदविल्याचे दिसुन आले नाही.

प्रश्न – श्री. काटकर यांनी तुमचे बयान नोंदविले नाही असे म्हणणे बरोबर होईल का ?

उत्तर – त्यांनी माझे बयान नोंदविले किंवा नाही मला आठवत नाही.

मी कवठा बॅरेजच्या मालकाकडे घटनास्थळ पंचनामा करण्यापुर्वी त्यांच्याकडे कोणते काम दिलेले आहे आणि कोणत्या परवानग्या दिलेल्या आहेत, त्याबद्दल चौकशी केली नाही. रिपोर्ट दाखल करे पर्यंत मी जमीनीत अर्धवट गाडलेला टँकर कोणाच्या मालकीचा आहे, त्याबद्दल चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्धवट गाडलेला टँकर मध्ये किती डिझेलचा साठा करु शकतात त्याबद्दलचा परवान्याची मागणी मी कवठा बॅरेजच्या मालकाकडे केली नाही.

प्रश्न – तुमच्याकडे डिझेल मोजण्याचे कोणतेही यंत्र नव्हते ?

उत्तर – आमच्याकडे डिझेल मोजण्याचे कोणतेही यंत्र नव्हते, परंतु कवठा बॅरेजवर एक स्टीलची पट्टी होती, ती डिझेलच्या टँकरमध्ये टाकुन आम्ही डिझेलची मोजणी केली.

सदर स्टीलची पट्टी ४ ते ७ फुट इतकी लांब होती. ज्या पट्टीने आम्ही मोजमाप केले ती पट्टी आम्ही जप्त केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट आणि प्रथम खबरी अहवालात स्टील पट्टीने मोजमाप केल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. मी जिल्हा पुरवठा अधिकारीकडे सदर स्टीलची पट्टीचे मोजमापाची सत्यता पडताळणी करणेकरीता

पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर अशी कोणतीही स्टीलची मोजमापाची पट्टी नव्हती. ज्या जागेचा पंचनामा केला त्या जागेची मालकी कोणाची आहे त्याची चौकशी मी केली किंवा कसे मला आठवत नाही. नमुने घेण्यासाठी काचेच्या बाटल्या श्री. काटकर यांनी आणल्या होत्या. त्या बाटल्या कुठुन आणल्या त्याची चौकशी मी केली नाही. सदर बाटल्या त्या पुर्वी कशासाठी वापरण्यात आल्या होत्या त्याची चौकशी मी केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, बाटल्या स्वच्छ असल्याची चौकशी केली होती. नमुने घेतल्याचे मी स्वतंत्र पंचनामे केले नाही. कारवाई दरम्यान नायब तहसिलदार श्री. किर्तक हजर होते ही बाब दर्शविण्यासाठी मी कोणत्याही दस्तावर सहया घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, श्री.किर्तक हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, टँकरचे मालक कोण आहे त्याबाबत मी चौकशी करुन त्याचे दस्तावेज मी रिपोर्ट देण्यापुर्वी प्राप्त करुन घेतले नाही. टिल्लु मशीन कोणत्या कंपनीची आहे ते मी जप्ती पंचनामा करतांना पाहिले होते. मला दाखविण्यात आलेल्या टिल्लु मशिनला कोणताही पाईप लावलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री. काटकर यांच्या सांगण्यावरुन खोटा रिपोर्ट दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.10.16 11:28:59 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. १५/१०/२०२५